आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३ जून २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- राज्य सरकारकडून कोविड - १९ च्या व्यवस्थापनासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी

- आसाममधे पूरस्थिती गंभीर, राज्यात २२ जिल्ह्यांमधल्या ५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अंतिम सामना रंगणार

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला. आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषांगिक खर्चालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. या आयोगाची स्थापना केली असली तरी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचा आदिवासी विकास विभाग सुद्धा कार्यरत राहणार आहे.

याशिवाय धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला इथली साडे आठ एकर जमीन हस्तांतरित करण्यासाठीच्या अटी, शर्तीमधल्या सुधारणांना मान्यता देण्यात आली आहे. यासह राज्य कामगार विमा महामंडळाचं दोनशे खाटांचं विमा कामगार रुग्णालय उभारण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करोडी इथली सहा हेक्टर गायरान जमीन, तसंच पुण्यातील बिबवेवाडी, अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर, सिन्नर, बारामती, सातारा आणि पनवेल इथल्या रुग्णालयांना जमीन द्यायला तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पथकराच्या सवलतीसाठी भरपाई देण्याचा आणि मुंबईच्या प्रवेशद्वाराच्या पाच पथकर स्थानकावर सवलत दिल्यामुळे महामंडळाला भरपाई देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला आहे.

**<><><><>**

कृषी क्षेत्रात होणारं संशोधन शेतकऱ्यांच्या आवाक्यात असावं यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. कृषीमंत्री आज पुणे दौऱ्यावर असून त्यांनी नारायणगांव इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. बनावट बियाणं आणि खतांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

त्यानंतर त्यांनी पुण्याच्या कृषी महाविद्यालयाला भेट दिली आणि तिथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या कृषी हॅकेथॉन कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी त्यांच्या हस्ते कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करण्यात आला. कृषी क्षेत्रासमोर नागरीकरण, औद्योगिकरण, पाण्याची कमतरता, मनुष्यबळाची कमतरता, वाढता उत्पादन खर्च ही आव्हानं आहेत. त्यामुळे किफायतशीर शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञान, उत्कृष्ठ बियाणं पोहोचवण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. एआयचा वापर, पाणी व्यवस्थापन, खताचं व्यवस्थापन, शेती कचरा व्यवस्थापन आदी विषय या हॅकेथॉनमधे मांडण्यात आले. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत नेण्याचं काम सगळ्यांना मिळून करायचं आहे, असंही पवार म्हणाले.चौहान यांच्या उपस्थितीत आज पुण्यातल्या बालेवाडी क्रीडा संकुलात प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा मेळावा तसंच महाआवास अभियानाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळाही होणार आहे.

<><><><>

राज्य सरकारनं कोविड- १९ च्या व्यवस्थापनासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सर्व आरोग्य सुविधांनी इन्फ्लूएंझा-सदृश आजार आणि श्वसनाची गंभीर समस्या असलेल्या ५ टक्के रुग्णांची तपासणी करावी, असे निर्देश दिले आहेत. आरोग्य विभागानं सर्व महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि जिल्हा प्रशासनांना हे निर्देश दिले आहेत. हातांची स्वच्छता, श्वसन संस्थेचं आरोग्य, खोकताना आणि शिंकताना तोंड आणि नाक झाकणं तसंच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचं वर्तन याबाबत जनजागृती करणारे उपक्रम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, राज्यात सध्या कोविडचे ५०६ रुग्ण उपचार घेत आहेत.

<><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष सत्र बोलावण्याची मागणी इंडिया आघाडीने केली आहे. नवी दिल्ली इथं इंडिया आघाडीच्या घटक पक्षांची बैठक आज झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार इंडिया आघाडीच्या सोळा घटक पक्षांनी संसदेचं विशेष सत्र बोलावण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिल्याची माहिती काँग्रेस खासदार दीपेंदर सिंह हुड्डा यानी बातमीदारांना दिली.

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या वेळी सर्व विरोधी पक्ष संरक्षण दल आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे होते, असं हुड्डा म्हणाले. तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या वक्तव्यांमुळे भारताच्या भावना दुखावल्याचं राजदचे खासदार मनोज झा यांनी म्हटलं आहे. हा सरकार किंवा विरोधकांचा प्रश्न नाही तर जबाबदारीचा प्रश्न आहे, त्यामुळे विशेष सत्र बोलावणं गरजेचं आहे, असं झा म्हणाले.

**<><><><>**

आसाममधल्या पूरस्थितीनं आणखी गंभीर रूप घेतलं असून, राज्याच्या २२ जिल्ह्यांमधल्या ५ लाखापेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. पुरामुळे होजई इथं एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, दिब्रुगड मध्ये दोन जण, तर हैलाकांडी इथं दोन जण बेपत्ता आहेत. राज्याच्या ६५ महसूल मंडळांमधली १ हजार २५० पेक्षा जास्त गावं पुरामुळे बाधित झाली असून, १२ हजार ६०० हेक्टरपेक्षा जास्त शेत जमिनीचं नुकसान झालं आहे.

ब्रह्मपुत्रा, बराक आणि या नद्यांच्या सर्व उपनद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे. पूरग्रस्त नागरिकांसाठी राज्य सरकारनं १६५ मदत छावण्या आणि १५७ मदत केंद्र उघडली आहेत. पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि राज्यातल्या पूरस्थितीचा आढावा घेतला. पूरग्रस्त भागात मदत आणि पुनर्वसनाच्या प्रयत्नांना केंद्र सरकारचं पूर्ण सहकार्य लाभेल असं

आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. दरम्यान, आसामच्या काही भागात आज हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

<><><><>

सिक्कीममध्ये लाचेन इथं अनेक ठिकाणी भूस्खलन झालं असून, दीडशेपेक्षा जास्त पर्यटक अडकून पडले आहेत. भारतीय हवाई दलानं पूरग्रस्त भागात मदत आणि बचावकार्य सुरु केलं आहे. उत्तर सिक्कीममध्ये चाटेन इथं अडकलेल्या नागरिकांच्या पहिल्या तुकडीची भारतीय हवाई दलानं आज सुटका केली.

मंगन जिल्ह्यात बचाव कार्यासाठी हेलिकॉप्टर तैनात करण्यात आली आहेत. एनडीआरएफनं आज हवाई दलाच्या मदतीनं जखमी सैनिक, त्यांचे कुटुंब आणि पर्यटकांची सुटका केली. मुसळधार पावसामुळे मंगन जिल्ह्यातली वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि राज्यातल्या पूरस्थितीचा आढावा घेतला.

दरम्यान, या ठिकाणी अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांच्या सुटकेचे प्रयत्न सुरु आहेत त्यांचा पुढचा प्रवास सुरु आहे. राज्य आपत्कालीन प्रतिसाद केंद्रानं ही माहिती दिली. या प्रवाशांच्या सुटकेसाठी केंद्रानं सिक्कीममधल्या महाराष्ट्र सदन निवासी आयुक्तांमार्फत स्थानिक प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधला होता.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. २००८ पासून सुरू झालेल्या आयपीएल स्पर्धेत आजतागायत या दोन्ही संघांकडे विजेतेपद आलेलं नाही. त्यामुळे दोन्ही संघांसाठी आजचा सामना महत्त्वाचा आहे.

<><><><>

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत भारताच्या पी व्ही सिंधूनं जपानच्या नोझोमी ओकुहराला नमवून द्वितीय फेरीत प्रवेश केला आहे. सिंधूनं ओकुहराचा२२-२०, २१-२३, २१-१५ असा पराभव केला. पुरुष एकेरीत मात्र चीनच्या शी यु की कडून पराभूत झाल्यानं भारताच्या लक्ष्य सेनचं आव्हान संपुष्टात आलं. या स्पर्धेत

आज पुरुष एकेरीत एच एस प्रणॉय तर पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचे सामने होणार आहेत.

**<><><><>**

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ नोंदणीसाठी ५ जून पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, अशी माहिती शिक्षण संचालक डॉ.श्रीराम पानझाडे यांनी दिली. ही मुदत ३ जूनला संपणार होती. इन-हाऊस कोट्याअंतर्गत खासगी व्यवस्थापनाच्या उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना १० टक्के जागा आरक्षित ठेवण्याचा निर्णय शासनानं जाहीर केला. या निर्णयामुळे होण्याऱ्या बदलानुसार विद्यार्थ्यांना आपल्या पसंतीक्रमात बदल करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून ही मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, २ जूनपर्यंत १० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नाव नोंदणी केली आहे.

**//<><><><>//**